MHBI080014912019

# नियमीत दिवाणी दावा क्र. ५२८/२०१९ मधील नि. ४८ खालील आदेश

वादीने दिवाणी प्रक्रिया संहितेच्या क्रम–६ नियम – १७ प्रमाणे दावा दुरुस्तीसाठी सदरचा अर्ज दिलेला आहे. वादीने सदरचा दावा प्रतिवादींविरुध्द ठराव होऊन मिळण्यासाठी व कायमचे मनाई हुकूमासाठी दाखल केला आहे. त्याने सदरच्या अर्जात कथन केले आहे की, सदरचा दावा दाखल करताना कलम १ मध्ये मिळकतीचे वर्णन केले आहे परंतु तिचे गाव,तालुका व जिल्हा नमूद करणे अनावधानाने राहून गेले आहे. त्यामुळे वादीला सदरचे दाव्याचे कलम क्र.१ मध्ये व तात्पुरत्या मनाई हुकूमाचे अर्जाचे कलम क्र.१ मध्ये ओळ क्र.१ नंतर शिवार मौजा वडवणी ता. वडवणी जि. बीड येथील, असा मजकूर समाविष्ट करावयाचा आहे. सदरच्या दुरुस्त्यांमुळे वादीचे मुळ दाव्याचे मागणीत अथवा कथनात फरक पडत नाही. म्हणुन शेवटी वादीने सदरच्या दुरुस्त्या दाव्यामध्ये व तात्पुरत्या मनाई हुकूमाच्या अर्जामध्ये करण्यास परवानगी देण्याची विनंती केली आहे.

४. सदरच्या अर्जास प्रतिवादींनी जबाब दिलेला असून त्यांनी त्यात कथन केले आहे की, वादीचा अर्ज कायदेशीर नाही. वादीने सदरचा दावा सन २०१९ मध्ये दाखल केला आहे व आत्ता वादी दुरुस्ती करुन मागत आहे. वादीने सदरचा अर्ज दावा प्रलंबीत ठेवण्यासाठी दिलेला आहे. शेवटी त्यांनी वादीचा अर्ज खर्चासह फेटाळण्याची विनंती केली आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | सदरच्या नियोजित दावा दुरुस्त्या मंजूर करणे आवश्यक आहे काय? | होय. |
| २. | आदेश काय? | अर्ज मंजूर करण्यात येत आहे . |

**मुद्दा क्र. १ बाबत**

५. मी वादीतर्फे विद्वान वकील श्री. देशमुख व प्रतिवादीतर्फे विद्वान वकील श्री. मुंडे यांचा युक्तिवाद ऐकला. मी सदरच्या दाव्यातील संबंधीत दस्तऐवज पाहिले. सदरचा दावा हा ता.२६.०९.२०१९ रोजी दाखल करण्यात आला आहे. वादीने सदरच्या दाव्यात व तात्पुरत्या मनाई हुकूमाच्या अर्जात मिळकत कोणत्या गावात, कोणत्या तालुक्यात व जिल्हयात आहे हे नमूद केल्याचे दिसून येत नाही. सदरची बाब ही गंभीर व निष्काळजीपणाची आहे. वादीने सदरचा दावा दाखल केल्यानंतर चार वर्षे तीन महिन्यांनी सदरचा अर्ज दिलेला आहे. परंतु दाव्याचे कायमचे निराकरण करण्यासाठी वादीने विनंती केल्याप्रमाणे दावा मिळकतीचे वर्णन म्हणजेच ती कोणत्या गावात, तालुक्यात व जिल्हयात आहे हे दाव्यात  नमूद करणे आवश्यक आहे. सदरची दुरुस्ती करण्यास परवानगी दिली नाही तर त्यामधुन दुसरे आणखी दावे दाखल करावे लागतील. तसेच सदरच्या दुरुस्त्यामुळे सर्व पक्षकारांमध्ये वादाचे खरे मुद्दे काय आहेत हे स्पष्ट होण्यास मदत होईल. वर नमुद केलेल्या कारणांचा विचार करुन मी या निष्कर्षापर्यंत आलेलो आहे की, सदरच्या नियोजित दावा दुरुस्त्या करण्यास परवानगी देणे न्यायाचे हितार्थ आवश्यक व गरजेचे आहे. म्हणुन मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. २ बाबत</u>**

८. मी वर नमुद केल्याप्रमाणे वादीने दावा दाखल करताना दावा मिळकतीची ओळख पटेल असे तिचे वर्णन दाव्यात कथन केले नाही. सदरची बाब ही वादीचे

निष्काळजीपणाची आहे. त्यामुळे प्रतिवादींना त्रास सहन करावा लागत आहे. सदरची वादीची चुक असल्यामुळे वादीने प्रतिवादींना खर्चाची रक्कम देण्याच्या अटीवर सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणुन मी मुद्दा क्र. २ च्या उत्तरासाठी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. वादीचा नि.क्र.४८ चा दावा दुरुस्तीचा अर्ज त्याने प्रतिवादींना एकूण खर्चाची रक्कम रु.१०००/- देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीने सदरची दावा दुरुस्ती १४ दिवसांच्या आत दाव्यामध्ये करावी.

दि. २१/१२/२०२३

(सो. द. घनवट)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
माजलगाव.

**शेरा**

मी शपथेवर सांगतो की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | श्री. हनुमंत बळवंतराव सूर्यवंशी |
| कोर्टाचे नाव | – | दि. न्या. व. स्तर, माजलगाव |
| न्यायनिर्णयाचा मजकूर सांगितल्याचा दिनांक | – | २८/०३/२०२३ |
| न्यायनिर्णय टंकलिखित केलेला दिनांक | – | २८/०३/२०२३ |
| न्यायनिर्णय स्वाक्षरीत केल्याचा दिनांक | – | २८/०३/२०२३ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | – | २८/०३/२०२३ |

स्वाक्षरीत/–

दिनांक – २८/०३/२०२३

(ह. ब. सूर्यवंशी)
लघुलेखक ग्रेड – २,
दिवाणी न्यायालय, व. स्तर, माजलगाव